नि.फौ.ख.क्र. ३९/२०१९
(नि. २३)

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नांव– मारिआन कैतान अल्फान्सो
वय – ७५ वर्षे, व्यवसाय – शेती
रा.आजगाव भोमवाडी, ता.सावंतवाडी. जि.सिंधुदुर्ग

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री.टि.ए.भणगे यांच्यामार्फत सुरु–**

दि. ०७/०९/२०१८ रोजी काय घटना घडली होती हे मला माहीत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की घटना काय घडली होती हे मला आठवत नाही. कथीत घटनेची मला आठवण करुन दिल्यास देखील मला ती घटना सांगता येणार नाही कारण ती घटना काय होती हे मला माहीत नाही. जॉन फर्नांडिस यांच्या घरी पोलीस आले, त्यांनी जॉन फर्नांडिस यांच्याकडे बेकायदा हत्याराची विचारणा केली असता जॉन फर्नांडिस यांनी आपल्या घरातून एक ठासणीची बंदूक आणून पोलीसांना दिली व ती मी पाहिली असे काही घडले नाही.

**सदर साक्षीदार सरकारी पक्षास सहाय्य करीत नसलेने त्यास सरकारी वकीलांनी उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली ती त्यांना देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की दि. ०७/०९/२०१८ रोजी सकाळी ८.०० वाजता मी जॉन पेद्रू फर्नांडिस यांच्या घरी गेले असता तेथे पोलीसांनी माझ्यासमक्ष जॉन फर्नांडिस यांच्याकडे त्यांच्या नावाची व त्यांच्याकडे बेकायदा हत्याराची विचारणा केली असता जॉन फर्नाडिस यांनी आपल्या घरातून एक ठासणीची बंदूक आणून पोलीसांकडे दिली व ती मी पाहिली. हे म्हणणे खरे नाही की जॉन फर्नांडिस यांनी ठासणीच्या बंदूकीचा परवाना नसतानाही ती बेकायदा स्वतःच्या घरात बाळगली. हे म्हणणे खरे नाही की आरोपी व मी एकाच गावचे असल्याने आमची चांगली ओळख असल्याने मी आरोपीविरुध्द न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.बी.एन.प्रभू यांच्यामार्फत नाकारला–**

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/–
दिनांक– २९/११/२०२३ (के.के.पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.